# वर्तुळ

**अनिल लक्ष्मण राव**

ते खूप मोठं शहर नव्हते तरी देखील एखाद्या शहारात अनोळखी व्यक्तीला शोधणं म्हणजे थोडं अवघड तर होतंच. काही ओळखींच्या सहाय्याने इथपर्यंत तरी मी येऊन पोहचलो होतो. रेल्वे स्टेशनमधुन मी बाहेर पडलो. नाटकाचे थिएटर बरंच लांब होते. मी एका शिक्षेला हात दाखवला. माझ्या पुढ्यात रीक्षा येऊन ऊभी राहीली. मी पत्ता दाखवला तर रिक्षावाल्याने माझ्याकडे आश्चर्याने पाहीले आणि येण्यास नकार दिला. पाच–सहा रिक्षावाल्यांनी तिथे येण्यास नकार दिला. काहीच कळत नव्हते असे का? सगळेच जणं नाही का म्हणत आहेत. शेवटी मी चालायला सुरुवात केली. चार किलोमीटर म्हणजे खूप लांब पण नव्हते. तरीदेखील अनोळखी शहरात लांबच होतं. मी ते शहर पाहता पाहता आणि लोकांना विचारत विचारत साधारण एक तासाने त्या थिएटरच्या समोर येऊन ऊभा राहीलो. रस्त्यातून येताना मी ज्यांना ज्यांना पत्ता विचारला होता त्यातील अनेकांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह आणि आश्चर्य मी पाहीले होते आणि सर्वच रिक्षावाल्यांनी येण्यास का नकार दिला त्याचे उत्तर मला थिएटरच्या समोर आल्यावर कळले.

मी देखील स्तब्ध होऊन पहात राहीलो. एका भयाण आणि मोडक्या तोडक्या वास्तूच्यासमोर मी येऊन उभा होतो. जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वीचे ते थियटर असावे. त्याच्या आजूबाजूला फक्त काटेरी झाडे होती. सुकलेले गवत होते. थियटरपर्यंत जाण्याचा रस्ता देखील दिसत नव्हता. एक तारेचे कुंपण होते कदाचित येथील म्युनिसिपालटीने लावलेलं असावं. त्या तारेच्याकुंपणा पलीकडे एक छोटीशी पाऊलवाट दिसत होती. मी मनाशीच विचार केला की नाटकाच्या संहीतेवर तर हाच पत्ता दिला आहे. तसेच नाटकाचे पुस्तक प्रकाशित होऊन जवळ जवळ तीसवर्षाचा अवधी झाला होता म्हणजे खूप वर्ष झाले नव्हते. कोणाला विचारावे? हे देखील प्रश्नचिन्ह होते कारण आजुबाजूच्या अर्धा किलोमिटरच्या परीसरात काही वस्ती देखील दिसत नव्हती. थियटरच्या थोडसं बाजुला छोटंसं घर दिसत होते. ते देखील मोडकं तोडकं. मी त्या घराच्या दिशेने वळतो. काही मिनिटात तेथे जाऊन ऊभा राहीलो. दरवाजा बंद दिसत होता. घराच्या आजुबाजूला थोडं व्यवस्थित दिसले. छोटीशी सुकलेली बाग दिसत होती. झाडं होती पण पाणी कमी मिळत असल्यामुळे सुकलेल्या अवस्थेत...मी त्या घराच्या पायथ्याशी बसतो. खरंतर मला प्रचंड भूक लागलेली होती. पण थियटरची अशी अवस्था का? श्रीनिवासरांनी अश्या ठिकाणी का पाठवलं होते. याचं कोडं मला काही कळत नव्हते.

मी कालच दुपारीच तर त्यांच्या घरी गेलो होतो. घरात ते एकटेच त्यांच्या स्टडीरुम मधे आरामखुर्चीत बसले होते. बहुतेक त्यांचा थोडा डोळा लागला होता. त्यांच्या छातीवर पुस्तक होते. मी हळूच ते हातात घेतले. टेबलावर ठेवले. त्यांचा चश्मा हळूच काढला. सर आता थकले होते. त्यांच्या चेहऱ्यावर थकवा जाणवत होता. सरांचे माझ्यावर अतोनात उपकार होते. त्यांनीच कॉलेजमधे माझ्यातील गुणांना पारखून मला नाट्य क्षेत्रात आणले. रंगभूमीचे धडे त्यांनी मला दिले. साहित्य, नाट्य, अभिनय, दिग्दर्शन या सर्व पैलूंचा त्यांनी मला अभ्यास करायला लावला. मी त्यांच्या शेजारच्या स्टुलावर बसलो. स्टूलाच्या आवाजाने सर जागे झाले.

‘‘ अरे, श्रीरंग कधी आलास?’’

‘नुकताच आलो होतो. तुम्हाला डोळा लागलेला पाहीला म्हणून उठवले नाही.’’

‘‘ कसं येणे केलेस?’’

‘‘सर, घरात कोणीच दिसत नाही? कुठे गेले आहेत?’’

‘अरे, हो..माय, लेक आज सकाळीच पुण्याला गेले आहेत. उद्या परत येतील. ऋग्वेद बोलला नाही ?’’

‘नाही सर, मी श्रीरंग पंडीतांना भेटायला जायच्या गडबडीत होतो. त्यामुळे ऋग्वेदशी कालपासून काही बोलणेच झाले नाही.’’

‘‘ अरे ! कधी निघणार आहेस?’’ सरांच्या चेहऱ्यावर अचानक आनंद झाल्याचे मी पहात होतो.

‘सर मी आजच रात्री निघायचं म्हणतो आहे. त्यांना भेटून येतो. त्यांना माझ्या ह्या प्रकल्पाबद्दल सांगण्यास मी

खूप उत्सुक आहे. मला त्यांचे आशिर्वाद देखील मिळतीलच नं !.''

'नीट विचार केला आहेस नां ! खूप विक्षिप्त माणूस आहे. मी त्याला शेवटचे तीस वर्षांपूर्वी भेटलो होतो. त्यानंतर आमची कधी भेट नाही. इतक्या वर्षात त्याचा कोणताही संपर्क होत नव्हता. त्याला पत्र पाठवली तरी ती परत आली होती. माझं पटायचं त्याच्याशी. सच्चा माणूस. चांगला लिहीत असे. पण गेल्या अनेक वर्षांत त्याचे काही लिहीणं वाचनात आले नव्हते. त्याने ही संहीता देखील मला पोस्टाद्वारे पाठवली होती. पत्रात त्याने फक्त एवढचं लिहीलं होते. तू हे नाटक चांगलं करु शकतोस म्हणून ही प्रत पाठवत आहे. मी त्याचं हे नाटक नाही करु शकलो. पण कोणीच हे नाटक करायला तयार झालं नाही. तुझ्यात हे नाटक करण्याची धमक मला दिसली. म्हणूनच तुला त्याची ही प्रत वाचायला दिली. तू देखील भाराऊन गेलास. यातच सगळं मला पावलं होते. मी हे नाटक सादर करु शकलो नाही त्याची खंत तर अनेक वर्षांपासून वाटत होती. पण अनेक वर्षांनंतर का होईना हे नाटक रंगमंचावर येत आहे हे त्याने देखील पहावे म्हणूनच मी तुला त्याला भेटायला पाठवत आहे. मी देखील आलो असतो पण मला प्रवास आता झेपणारा नाही.''

'सर, काही चिंता करु नका. त्यांना मी भेटून येतो तसेच त्यांना नाटकाच्या मुर्हूताला देखील आमंत्रित करुन येतो.......''

श्रीनिवास सर तेव्हा फक्त हसले होते. त्या हसण्याचा अर्थ मला तेव्हा मला कळला नव्हता. आत्ता देखील कळत नव्हता. तेवढ्यात त्या मोडक्या तोडक्या घराच्या आतून 'श्रीधर' करुन हाक ऐकू येते. तसा मी दचकून उठतो. पहातो तर घराच्या दरवाज्यात साधारण ऐंशीच्या आसपास असलेले म्हातारे गृहस्थ उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावर वेगळं तेज दिसत होते. हसत हसत म्हणाले,

'ये आत ये...''

मी थोडासा बिचकत बिचकत उठतो. मनात असंख्य विचार आलेले असतात. यांना माझे नाव कसे माहिती ? हे प्रश्नचिन्ह घेऊन मी त्यांच्या मागे भारवल्यागत आत गेलो. आतल्या खोलीत श्रीनिवास सरांना पाहीले तर मी ओरडलोच

''सर, तुम्ही. ? मला तर नाही म्हणाला होतात.''

''तुला सरप्राईज द्यायचे होते. मला तुझी ओळख माझ्याकडूनच याला करुन द्यायची होती. म्हणून तू निघालास त्याच रात्री मी विमानाने तुझ्या आधीच येथे येऊन पोहचलो.''श्रीनिवास सर हसत हसत म्हणाले.

''काय हे सर, मला आधी म्हणाला असतात तर आपण दोघं बरोबर नसतो का आलो ?''

''ते कसं शक्य होते श्रीधर ? हा प्रवास सगळ्यांना एकटाच करायचा असतो. कोणीही बरोबर नसतो आपल्या ?'' श्रीनिवास सर म्हणाले.

''म्हणजे काय सर ?'' मी आश्चर्याने त्यांच्याकडे पाहीले. तसे त्यांनी त्या म्हाताऱ्या गृहस्थाकडे वळत हसत हसत म्हणाले, ''श्रीरंग हाच तुझ्या नाटकाला न्याय देऊ शकतो. त्याच्याकडे सार्मथ्य आहे. हुशार आहे. त्याने लेखन आणि नाट्यक्षेत्रात अनेक विक्रम केले आहेत हे तर तू जाणतोच आहे आणि श्रीधर हाच माझा मित्र श्रीरंग पंडीत.''

मी त्यांच्या पाया पडणार तसे ते एकदम मागे झाले. त्यांनी नकार दिला.

''मला माझ्या पाया पडलेले आवडत नाही. तू लवकर लवकर हे नाटक सादर करावं अशी माझी इच्छा आहे. पण माझी अट एक आहे !''

'तुमच्या सगळ्या अटी मान्य करीन मी !''

''पहा हं... ''

' सांगुन तर पहा. मला झेपत असली तर.... ''

माझं वाक्य अर्धेवट तोडतच श्रीरंग जणू काही ओरडलेच, '' झेपायलाच लागेल. नाहीतर हे नाटक होऊ शकणार नाही.''

त्यांच्या आवाजात एक जबरदस्त आत्मविश्वास होता.

''काय अट आहे ?'' मी हळूच विचारले.

''या नाटकाचा पहीला प्रयोग माझ्याच शहराच्या याच थियटरमधे होणे गरजेचे आहे.''

मी आवाक् होऊन त्यांच्याकडे पहात राहीलो. त्यांच्या बोलण्यात एक जरब होती. 'इथेच झालं पाहीजे' हा त्यांचा आग्रह नाही तर 'हट्ट' होता. मी एकदम बोलून गेलो.

'पण हे कसं शक्य आहे.? थियटरला खूप दुरीस्तीची जरुर आहे. ज्यात अनेक महीने जातील. तुमचा असा आग्रहच का आहे?''

त्यांनी काही न बोलता माझ्याकडे रोखून पाहीले. त्यांची नजर जरा मला विचित्रच वाटली. मी थोडासा घाबरलो. कारण त्या नजरेला वेगळीच धार होती. ते शांत दिसत असले तरी मनात कुठेतरी त्यांचा अशांतपणा चेहऱ्यावर दिसून येत होता.

''श्रीधर,कारण माझं संपूर्ण आयुष्य याच थियटरमधे गेले आहे. याच थियटरमधे मी अनेक नाटके केली आहेत. हेम्लेट, ऑथेल्लो..नटसम्राट, रायगडाला जेव्हा जाग येते, येथेच घडली होती. हे थियटर एकेकाळी नावाजलेले होते. मी हे चाळीस वर्षांपूर्वी विकत घेतलं होते. हे खूप जुनं थिएटर आहे. चाळीस वर्षांपूर्वी याच्या मालकाने मला देखील हे थिएटर कधी विकणार नसशील तर तुला विकतो असे सांगितले होते. त्यांचा देखील या वास्तुवर खुप जीव होता. याच वास्तुने मला नाव, किर्ती, अफाट पैसा दिला. पण वेळ बदलत गेली. नवनव्या संकल्पना आल्या. छाटे छोटे थियटर होऊ लागले त्यामुळे हे लोकांना महाग आणि नकोस झाले. मला माझं हे थियटर परत पहील्यासारखे गजबजलेलं पाहायचे आहे. वचन दे श्रीधर मला, की ही अट तू पूर्ण करशील.''

''श्रीधर कसला विचार करतोस. माझी गुरुदक्षिणा हीच मागतोय तुझ्याकडे असे समज आणि माझ्या मित्राची अट मान्य कर... त्याचे हे नाटक रंगमचांवर आणू शकलो नाही याची खंत मला आयुष्यभर राहीली होती. पण तू जर ही अट मानली तर माझी खंत देखील पूर्ण होईल. मी नाही करु शकलो पण माझ्या शिष्याने माझ्या मित्राचे नाटक रंगमचांवर आणले. याचे समाधान लाभेल. एक वर्तुळ पूर्ण होतानां मी पहात आहे. अनेक वर्षांपासूनचे अपूर्ण राहीलेले वर्तुळ आता तुच पूर्ण करु शकशील.''

मी भारावलेल्या अवस्थेत होतो. काहीच कळत नव्हते. आजुबाजुला कोणीच नव्हते. आमच्या तिघांशिवाय...वातावरण भयाण होते तरी देखील एक वेगळीच प्रसन्नता मी अनुभवत होतो. त्या प्रसन्नतेतच मी श्रीरंग पंडीत यांना वचन देतो.

'' मी तुमचे हे नाटक याच थिएटरमधे लवकरात लवकर सादर करीन असे मी वचन देतो.''

त्या वयस्कर असलेल्या श्रीरंग पंडीतांच्या डोळ्यातून अश्रू आल्याचे मला जाणवत होते. श्रीनिवास सरांच्या चेहऱ्यावर एक वेगळ्याच समाधानाचे तेज मला दिसत होते. दोन्ही मित्रांच्या चेहऱ्यावर आलेल्या समाधानाच्या स्मिताला मात्र मी ओळखू शकत नव्हतो. मी काही बोलणार तेवढ्यात श्रीनिवास सर म्हणाले,

'मला पुर्ण खात्री होती. तू हो म्हणशील. मी धन्य झालो. श्रीधर आता वेळ वाया घालवू नकोस. आम्ही पिकलेली पानं आहोत. कधी गळून पडतील याचा नेम नाही. तू आता कामाला लाग. थिएटर कसे चांगले करायचे हे तुला मी काही सांगायची जरुर नाही. अडचणी अनेक येतील तरी देखील न डगमगता पुढे जा. आमचे दोघांचे आशिर्वाद तुझ्या पाठीशी आहेतच. काय श्रीरंगा बरोबर नां ! ''

त्या दोन मित्रांचे चेहरे तृप्तेने जणू तेजाळलेले मला दिसत होते. समाधानाचे तेज बहुतेक हेच असते असे मला वाटत होते. श्रीरंग पंडीत आतल्या खोलीत गेले. एक मळकट अशी फाईल घेऊन आले. त्या फाईलवर ''वर्तुळ'' असे सुंदर अक्षरात लिहीले होते. ती माझ्या हातात देत म्हणाले.

'तुझ्या सवडीने ही फाईल वाच. तुला पुढचा मार्ग नक्कीच सापडेल. तुला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. कारण हल्लीच्या जगात कला जोपसणाऱ्यांपेक्षा कलेचा बाजारीपणा करणाऱ्यांची जमात जास्त आहे. प्रेक्षक देखील काहीही पाहण्यास आवडते झाले आहे. पाचंटपणा आणि जे वास्तविक नाही त्यात रमणारी ही पिढी आहे. इतिहासाची पानं देखील बदलू पाहात आहेत. पण नविन पिढीला देखील साहित्य, कला आणि नाटक काय आहे ते दाखवणे गरजेचे

आहे. आता ते कर्तव्य तुझ्यासारख्या नवीन पिढीचे आहे.  मी देखील नवीन कल्पना उपयोगात आणल्या होत्या. प्रत्येक कलाकाराने प्रायोगिक नाटके करता करता पोटापाण्यासाठी व्यवसायिक नाटके करायला काहीच हरकत नाही. पण नावलौकीक झाल्यानंतर प्रायोगिक रंगभूमीला नावे ठेवणे मला सहन झाले नाही. माझ्या या वास्तुत प्रायोगिक नाटकाला प्रथम मान्यता होती. माझी देखील अनेक नाटके प्रायोगिक आणि व्यवसायिक या समांतर रेषेतच लिहीली गेली. गाजली देखील. त्यात ज्या ज्या कलाकरांनी कामे केली ते आज खुप मोठी झाली आहेत. ते कलाकार देखील  हे माझं शेवटचे नाटक कोणीही करायला तयारच झाले नाही. काय वेगळे आहे त्यात? माझ्यासारखे अनेक नट,लेखक या व्यवसायिकतेच्या लाटेमुळे दुखवले गेले होते आणि संपले. ज्यांनी ज्यांनी त्याच्यावर आवाज उठवला त्यांच्या मताला कोणीही काहीच किंमत दिली नाही. आमची पिढी देखील नाटक करुन पैसे कमवायची पण रंगभूमीचा आदर करायची. आजची पिढी नाही करत असे नाही पण पैसा खूप मोठा झाला आहे नाटक खूप खूप लहान झाले आहे. माझं नाटक याच्या पलीकडंचं आहे पैश्यापेक्षा नाट्य काय आहे हे ते मांडत आहे म्हणून ते अवघड आहे. कदाचित व्यवसायिक गणित सुरुवातीला चुकू शकते पण एकदा का हे नाटक प्रेक्षकांना समजलं की हेच नाटक खुप मोठं नाटक होऊ शकते हा माझा पूर्ण आत्मविश्वास आहे.आता या नाटकाचे सर्व निर्णय तुच घे आणि लवकर हे रंगमंचावर घेऊन ये. माझे आशिर्वाद तुझ्यापाठीशी कायमच राहातील.''

ते खूप भावूक झाले होते. जणूकाही त्यांचे या जीवनाचे कार्य संपले होते. यासाठीच ते बहुतेक जगत होते असे वाटत होते. काही वेळ कोणीही काहीच बोलले नाही. मी देखील अस्वस्थ झालो होतो. कारण हा प्रकल्प खूप मोठा होता. या नाटकात यांच्या भावना अडकल्या होत्या. त्यांच्या भावना पुर्ण करण्याचे मी वचन त्यांना दिले होते. त्यामुळे माझे सर्वस्व या प्रकल्पावर लावणे गरजेचे होते. मी ती शांतता भंग केली.

'' सर चला तर आपण देखील बरोबर जाऊया.''

''श्रीधरा कसं शक्य आहे. इतक्या वर्षांनी आम्ही भेटत आहोत. हा लगेच थोडीच सोडणार आहे. तू निघ हरकत नाही. माझी काळजी करुन नकोस.''

मला काय करावे कळेनासे झाले होते. तेवढ्यात बाहेर कोणीतरी आले असा भास झाला म्हणून मी बाहेर आलो. तर एक गृहस्थ उभे होते. ते म्हणाले,

''काय हो. येथे काय करताय?''

'' काय म्हणजे? अहो मी, माझे  सर आणि श्रीरंग पंडीत गप्पा मारतोय? मी हसत हसत म्हणालो.

''काय? श्रीरंग पंडीत आणि गप्पा?'' त्यांनी आश्चर्याने विचारले.

''हो. का ? काय झाले.? तुम्ही कोण?''

''अहो. मी या परीसराचा म्युनिसिपालटीचा रखवालदार आहे. या पडक्या घरात कोणीच राहात नाही. ते तुम्ही श्रीरंग पंडीत म्हणतात नां ते तर वीस वर्षांपूर्वीच आटोपलेत. हे थियटर पण त्यांचेच होते. एकेकाळी त्यांचा खूप दरारा होता. पण कोणीतरी त्यांचा अपमान केला. त्यामुळे त्यांच्या आत्मसन्माला धक्का लागला. त्यामुळे ते खचले. त्यातच ते मरण पावले. पण साहेब या थियटर मधे ते नेहमी येतात असे म्हटलं जातं.  तेव्हापासून या थियटरमधे कोणतेही नाटक होत नाही. काही ना काही अडचणी येतात. पण या घराच्या परीसरात मी नेहमी येतो. बागेत जमेल तसं पाणी टाकतो. माझं कामंच आहे. पण मला तर कधी पंडीतसाहेब दिसले नाहीत. साहेब, तुम्हाला काही भास वगैरे झाला असेल. चला.''

''अहो चला काय, तुम्ही म्हणता ते कसे शक्य आहे,  माझे सर देखील आले आहेत.''

'तुमचे सर...??''

तेवढ्यात माझा मोबाईल वाजतो. मोबाईलवर ऋग्वेदचा नंबर दिसत होता. मी पटकन घेतो. सरांचा मुलगा ऋग्वेद होता.

'श्रीधर, कुठे आहेस? काल रात्रीपासून तुला फोन ट्राय करतोय तुझा फोन ट्रेसच होत नाही. कव्हरक्षेत्राच्या

बाहेरच दाखवतोय. आत्ता लागतोय. तू कोठे आहेस ?. अरे, काल दुपारी बाबा गेले.''

''काय ? कसं शक्य आहे ?

''श्रीधर, कसं शक्य आहे म्हणजे ? ''

''अरे, मी सरांना तर काल दुपारी साडेचार सुमारास भेटलो होतो. मी त्यांच्याशी अर्धातास गप्पा मारत होतो. तुम्ही नाही दिसलात म्हणून विचारले, तर म्हणाले की तुम्ही पुण्याला गेलेत उद्या येतील. काका देखील घरात नव्हते. मी माझ्याकडच्या चावीने घराचा दरवाजा उघडला. सरांना डोळा लागला होता म्हणून मी बसून होतो पण माझी चाहुल लागली तसे ते उठले. ऋग्वेद, मी निघालो तेव्हा असेही म्हणाले, आज कोणीच घरात नव्हते. एकटं एकटं वाटत होते. तू भेटलास खूप बरं वाटले. ''

'' तू बाबांना भेटायला आला होतास ? दुपारी ? साडेचार वाजता ? कसं शक्य आहे ? काका संध्याकाळी घरी आले तर बाबा आरामखुर्चीतच बसलेले पाहुन त्यांनी त्यांना हाका मारल्या पण बाबांची हालचाल दिसेना म्हणून त्यांनीच डॉक्टरांना बोलावले तर त्यांनी बाबा दुपारीच साधारण चार वाजता गेल्याचे सांगितले. काकांनीच तर मला फोन केला. श्रीधर तू बरा आहेस नां!! तू लवकर परत ये. त्यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली आहे. त्यात स्पष्ट लिहीले आहे की श्रीधर आल्याशिवाय माझे क्रियाक्रम करु नये. तू आहेस तरी कुठे ?''

ऋग्वेदचा आवाज मला ऐकू येईनासा झाला होता. माझ्या हातातून फोन गळून पडला होता. माझ्या डोळ्यासमोर अंधारी आल्यासारखे होत होते. कसेबसे मला त्या गृहस्थाने पडता पडता सांभाळले. मी तिथेच मटकन् खाली बसलो. खुणेनेच त्यांच्याकडे पाणी मागितले. मला पाणी देत म्हणाले.

''साहेब, काय झाले ? तुम्हाला बरे वाटत नाही का ? कुठून आलात ?'' मला सगळे काही स्पष्ट दिसू लागले होते. माझे भारावून इथपर्यंत येणे आणि पुढील घटना घडणे. तेव्हाच मला नाटकातील काही वाक्य आठवली.

' आत्मसन्मानाचे सुख कशात असते हे ज्याला कळत नाही त्याला आत्मसन्मान काय हे सांगायची गरजच नसते. मी माझा आत्मसन्मान कोणालाही विकत नाही. विकणार देखील नाही. मग आत्मसन्माला जिथे धक्का लागतो तिथे थांबणं देखील अवघड होऊन जाते. मी अशा ठिकाणी कधी थांबलो नाही म्हणूनच मी अहंकारी आहे असा समज समाजाने करुन माझ्यावर टीका केली. मी अहंकारी नव्हतो पण माझ्या आत्मसन्मानाला मी कोणत्याही मर्यादेत बांधू शकत नाही. माझं लेखन, माझं नाटक हेच माझ्यासाठी माझा आत्मसन्मान आहे. त्याची प्रतारणा केलेली तर मला कदापी मान्य नाही. येथे जो कोणी येतो तो त्याच्या गतजन्मातील काही ऋणी फेडण्यासाठीच येत असतो. एक वर्तुळ संपले की तो दुसऱ्या वर्तुळात प्रवेश करुन पुढील आयुष्याचा प्रवास करणारच पण त्याला गती मिळायला हवी. जोपर्यंत त्याची अपुर्ण इच्छा पूर्ण होत नाही तो पर्यंत त्याला गती मिळत नाही तोपर्यंत तो भटकतच राहतो. इच्छा ज्या दिवशी पूर्ण होते तेव्हा या जन्माचे वर्तुळ पूर्ण होऊन त्याला पुढील आयुष्यासाठी गती मिळते आणि पुन्हा एकदा नवीन जन्म-मरण या वर्तुळात त्याचा प्रवेश होतो...''

मी अचानक धावत आत येतो. आत कोणीच नव्हते. म्हणजे हे गृहस्थ म्हणत होते ते खरं होते. ऋग्वेद म्हणाला ते देखील खरं होते. याचा अर्थ एकच होत होता. श्रीनिवास सर आणि श्रीरंग पंडीत या दोन मित्रांचे वर्तुळ संपलेले होते. अनेक वर्षांपासून श्रीरंग पंडीत यांना गती मिळत नव्हती. म्हणजे श्रीरंग पंडीत यांना श्रीनिवास सरांच्या मृत्यूची कल्पना आली असणार त्यांनीच आपल्या मित्राच्या साहाय्याने हे निश्चित करून मला येथे घेऊन आले होते. नियतीचा हा निर्णय होता. त्यांचे या जन्माचे वर्तुळ पूर्ण करुन पुढील आयुष्याच्या वर्तुळाच्या प्रवासाला गती देण्याची निवड नियतीने माझी केली होती. माझ्या मागे तो गृहस्थ देखील आत आला. मी समोर एका खुर्चीवर अलगद बसतो. माझ्या डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंकडे तो आश्चर्याने आणि नवलाने पहात होता. त्या अश्रूंचे मोल तोच काय कोणीही समजू शकणारे नव्हते.

***